**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2019: 6.251, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2019, VOL- 7/35*

# भाषा शिक्षणात श्रवण कौशल्याचा विकास

**शाम रणदिवे**

*सहाय्यक प्राध्यापक, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे-51*

**Abstract**

*भाषेला मानवी जीवनात महत्वाचे स्थान आहे. बुद्धी, वाचा शक्ती, व भाषेच्या जोरावर मानव निसर्गामध्ये श्रेष्ठ ठरला आहे. भाषा मानवाला घडविण्याचे काम करते. एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी येणारा संपर्क व त्यातून होणारे विचार, भावना व कल्पनांचे आदान-प्रदान भाषेच्या माध्यमातूनच घडते. मानव स्वतःची सुखदुःखे, भावना, गरजा, आशा आकांक्षा, अपेक्षा भाषेतूनच व्यक्त करीत असतो. भाषा व समाज यांचे नाते परस्परावलंबी असते. भाषा एक सामाजिक संस्था असून ती समाजातील विविध घटकांना एकसंघ ठेवण्याचे कार्य करते. भाषा मानवी जीवनात जशी महत्त्वाची कार्ये पार पाडते तसेच भाषेला शिक्षणातही खूप महत्त्वाचे स्थान आहे. ज्ञानदानाचे, ज्ञान ग्रहणाचे तसेच ज्ञान प्रकटीकरणाचे माध्यम भाषाच आहे. म्हणून अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत भाषेला विशेष स्थान आहे. भाषेद्वारे बालकाचा बौद्धिक, भावनिक, मानसिक सामाजिक विकास होत असतो. भाषेद्वारे केवळ ज्ञानदानाचे व ज्ञान संपादनाचे कार्य होत नसून विविध कौशल्य व विविध कलाही भाषेद्वारेच आत्मसात करता येतात.*

***की वर्ड:*** *भाषा शिक्षण, श्रवण कौशल्य*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## 1) प्रस्तावना

भाषेचा मूळ गाभा म्हणजे बोलणे, हे बोलणे प्रत्येक भाषेत वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट धनीद्वारे होत असते. या भाषिक ध्वनींना वर्ण म्हणतात. या प्रत्येक ध्वनी चिन्हांना त्या भाषेची अक्षरे म्हटले जाते. भाषेमुळे सामाजिक, सांस्कृतिक वारसा जपला जातो. भाषेद्वारेच व्यक्तीला समाजामध्ये आत्मविश्वासाने वागण्याची क्षमता प्राप्त होते. भाषा मानवाला समृद्ध व सुसंस्कृत बनविते. भाषेद्वारे मानव आत्म प्रकटीकरण करून आपल्या मनातील भावना इतरांना पुढे मांडून, मनातील भावनांना वाट करून देत असतो. भाषेद्वारे आत्म प्रकटीकरण केल्यानंतर मानवी मनातील भावनांची कोंडी कमी होऊन आपोआपच ताणाचे कपाती करण होते. भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पद्धत. भाषा म्हणजे माणसाने एकमेकांमध्ये विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी प्रतीकात्मक ध्वनी समूहांची रूढ केलेली सर्वमान्य व्यवस्था होय. कोणतीही भाषा ही बालकास जन्मताच आपोआप येत नाही तर ती भाषा बालकास शिकावी लागते. भाषा ही अर्जित संपत्ती असून ती श्रवण आणि अनुकरणातून शिकता येते. कोणतीही

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

भाषा शिकण्यासाठी ती भाषा आपल्या सतत कानावर पडावी लागते. सतत कानावर पडणाऱ्या भाषा बालक निरीक्षणातून, अनुकरणातून व श्रवणाद्वारे लवकर शिकते.

भाषा शिक्षणात बालकास प्रथम श्रवणाची संधी व नंतर बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. वास्तविक बोलता येण्यापूर्वी बालक कितीतरी दिवस अगोदर ऐकण्याचे काम करीत असते. आणि त्याच वेळी ध्वनी निर्मितीचाही प्रयत्न करीत असते. भाषा शिकण्याचे श्रवणेंद्रिय हे नैसर्गिक व सुलभ साधन आहे. जन्मल्यापासून जे ध्वनी, शब्द, भाषा कानावर पडतात तीच भाषा मूल प्रथम शिकते. बालकाच्या कानावर जर दोन भाषा पडत असतील तर अशा बालकास दोन भाषा शिकता येतात कारण बाल वयात श्रवणेंद्रिय अत्यंत तीव्र व संवेदनशील असते. बालक सर्वस्वी आपोआप व आपल्याच प्रयत्नाने भाषा शिकत नाही तर मोठी माणसे, भावंडे, शेजारी त्या बालकास शिकण्याला प्रवृत्त करतात, मदत करतात. अनेक नवनव्या गोष्टींकडे त्याचे लक्ष वेधतात. त्या नव्या वस्तूंची नावे बालकाला ऐकवीतात. ती नावे त्याने उच्चारावी म्हणून त्याला प्रोत्साहन देतात. बालकाच्या ठिकाणच्या नैसर्गिक जिज्ञासा प्रवृत्तीचा व क्रियाशीलतेचा उपयोग भाषा शिक्षणास होत असतो. त्यातूनच त्याच्या स्मरणशक्तीची वाढ होत असते. भाषा समजण्यासाठी भाषा ग्रहणशक्तीचा विकास व्हावा लागतो. त्यासाठी आपल्याला श्रवणक्षमता आणि वाचन क्षमता यांचा विचार करावा लागतो. भाषा समजल्यानंतर भाषेचा व्यवहारात उपयोग करावा लागतो. यासाठी आपणास भाषण व लेखन या क्षमतांचा विचार करावा लागतो.

श्रवण म्हणजे ऐकणे. कोणतेही आवाज आपण श्रवणेंद्रियामार्फत ऐकतो. ऐकलेले आवाज मेंदूकडे पोहोचविले जातात तेथे त्यांचा परस्पर संबंध लावला जातो व त्यातून अर्थ निर्माण होतो.

**2) कार्यात्मक व्याख्या**

**भाषा शिक्षण**

शालेय स्तरावर भाषा शिकविण्याची व शिकण्याची प्रक्रिया म्हणजे भाषा शिक्षण.

**ऐकणे (Hearing)**

ऐकणे कानावर सहज पडणारे ध्वनी म्हणजे ऐकणे.

**श्रवण (Listening)**

श्रवण विशिष्ट हेतूने लक्ष देऊन ऐकणे म्हणजे श्रवण.

**3) श्रवण प्रक्रिया**

मुलांवर होणारे भाषिक संस्कार पहिल्यांदा श्रवणामार्फतच होतात. व्यक्तीच्या आजूबाजूला अनेक वेगवेगळे ध्वनी असतात पण हे ध्वनी जेव्हा लक्षपूर्वक व हेतुतः ऐकले जातात तेव्हा श्रवण म्हणतात. ध्वनी

Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

कानावर पडणे त्याचा मेंदूला संदेश पोहोचणे या दोन्हींचा अर्थ पूर्व ज्ञानाशी जुळविला जाणे, त्याचा अर्थ बोध होणे व ध्वनी मेंदूमध्ये साठविला जाणे यात विविध प्रकारच्या शारीरिक व मानसिक प्रक्रिया घडतात. श्रवणास ज्ञान ग्रहणाचे प्रवेशद्वार म्हटले जाते. श्रावणाचे महत्व सांगताना रामदास स्वामी म्हणतात

सावध असावे अवघे चित्त
श्रवण करावे कान देत
अनुभव साठा करण्या हेत
श्रवणशक्ती वाढवावी

- समर्थ रामदास स्वामी

**4) श्रवण कौशल्यची वैशिष्ट्ये**

❖ श्रवण ही निष्क्रियपणे घडणारी क्रिया नसून ती आपल्या सक्रिय सहभागाने घडणारी प्रक्रिया आहे.

❖ श्रवणक्षमता निसर्गदत्त नाही आपल्याला ऐकू येते म्हणजे श्रवणही करता येते असे नाही.

❖ बऱ्याच व्यक्तींमध्ये श्रवणक्षमता अल्प प्रमाणात व निकृष्ट प्रतीची असते.

❖ ऐकण्याच्या क्रियापेक्षा श्रवण ही क्रिया गुंतागुंतीची व उच्च दर्जाच्या मानसिक प्रक्रियांची गरज असलेली क्रिया आहे.

❖ श्रवण क्रिया गुंतागुंतीची असल्याने अवधान ठेवून श्रवण करावे लागते.

❖ श्रवण केलेल्यांपैकी एक दशांश भाग लक्षात राहतो म्हणून वक्त्याच्या बोलण्यातील महत्त्वाच्या मुद्द्यांची लिखित नोंद ठेवणे आवश्यक असते.

**5) श्रवण प्रक्रियेतील अडथळे**

❖ दोन व्यक्तींमध्ये काही कारणाने ध्वनीचे वहन योग्य प्रकारे न होणे.

❖ वक्ता जर भरभर किंवा फार सावकाश बोलत असेल तर श्रवण प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो.

❖ वक्त्याच्या उच्चारात दोष असेल तर श्रोत्यांचे श्रवण परिणाम कारक होऊ शकत नाही.

❖ श्रोत्याला वक्त्याचा विषय न आवडणे श्रोत्याला वक्त्याचा विषय आवडत नसेल तर श्रावण चांगल्या प्रकारे शकत नाही.

❖ श्रोत्याच्या मनात व वक्त्याविषयी पूर्वग्रह असतील तर श्रवण चांगल्या प्रकारे होत नाही.

❖ श्रोत्याकडे एकाग्रता नसेल आणि तो केवळ श्रवण करीत असल्याचे भासवीत असेल तरीही श्रवण कौशल्याचा विकास होत नाही.

❖ शुल्लक कारणामुळे श्रोत्यांचे अवधान विचलित होत असेल तर श्रवण प्रक्रियेमध्ये बाधा येते.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

❖ वक्त्याचा विषय श्रोत्यांसाठी पूर्णपणे अपरिचित असेल तरीही श्रावण होत नाही.

**6) भाषा शिक्षणात श्रवण कौशल्याची गरज**

❖ ध्वनी ग्रहण करण्याच्या क्षमतेचा विकास करण्यासाठी.

❖ ध्वनीवेगानुसार ध्वनीभेदानुसार अर्थाचा क्रम लावण्यासाठी.

❖ ध्वनीचे वर्गीकरण करण्यासाठी.

❖अर्थानुसार अचूकउच्चार करता येण्यासाठी.

❖ ध्वनी व्यवस्था आत्मसात करण्यासाठी.

❖ परिसर भाषा आत्मसात करण्यासाठी.

❖ भाषेचे व्याकरण विषयक व्यवस्थापन करण्यासाठी.

❖ शब्द संपत्ती आत्मसात करण्यासाठी.

❖ बोलणाऱ्याच्या वाक्याचा संदर्भ लक्षात घेऊन अर्थ निश्चिती करण्याच्या क्षमतेचा विकास करण्यासाठी.

❖ वक्त्याच्या आवाजातील चढ-उतारांचे विश्लेषण करून त्यातून व्यक्त होणाऱ्या भिन्नभिन्न अर्थछटा समजून घेण्याच्या क्षमतेत वाढ होण्यासाठी.

❖वक्त्याला देहबोली व हावभावावरून योग्य प्रकारचा प्रतिसाद देण्याच्या क्षमतेत वाढ होण्यासाठी.

❖ भाषेतील विशिष्ट शब्द उच्चारताना कोणत्या चुका होतात ही बाब लक्षात येण्यासाठी.

**7) भाषा शिक्षणात श्रवण कौशल्याचे महत्त्व**

❖ श्रवण हे भाषिक कौशल्यामधील पायाभूत कौशल्य आहे पायाभूत कौशल्य जेवढे अधिक चांगले तेवढी त्यावर आधारलेली कौशल्य अधिक प्रभावी ठरतात.

❖ लहान मूल श्रवणातूनच भाषेतील ध्वनी, शब्द  समूह व वाक्याची रचना ओळखते नंतर आत्मसात करून वापरू लागते.

❖ प्रभावी श्रवण कौशल्य स्वतःकडे असल्यास विचारांचे आदान-प्रदान प्रभावीपणे करता येते.

❖ चांगल्या श्रवण कौशल्यामुळे बोलणाऱ्याच्या विचारांचा सारांशाची नोंद  करता येतो व ही माहिती आवश्यकतेनुसार वापरता येते.

❖ विद्यार्थ्यांना दर्जेदार श्रवणाची माहिती होते.

❖ विद्यार्थ्यांना स्वतःचे ध्येय समजून घेऊन श्रवणाद्वारे त्या ध्येयाची पूर्तता करता येते.

❖ प्रभावी श्रवण कौशल्याच्या विकासामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास होतो.

❖ श्रावणामुळे समाजात परस्पर संबंध टिकून राहतात.

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

❖ कौटुंबिक संवादाद्वारे कुटुंबाला एकत्र ठेवण्याचे कार्य श्रवण कौशल्याद्वारे साध्य होते.

❖ श्रवण व आकलन यांचा घनिष्ठ संबंध आहे हे विद्यार्थ्यांच्या लक्षात येते.

❖ श्रवण कौशल्यामुळे भाषेतील विविधता व सूक्ष्म साम्यभेद विद्यार्थ्यांच्या लक्षात येतात.

❖ प्रभावी श्रवण कौशल्यामुळे विद्यार्थ्यांवर नीती मूल्यांचे संस्कार होतात.

❖ प्रभावी श्रवण कौशल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरण क्षमतेचा विकास होतो.

❖ श्रवण कौशल्याच्या विकासामुळे आपले समाजात आदराचे स्थान निर्माण होते.

❖ श्रवण कौशल्य हे भाषण कौशल्यास सहाय्यक ठरते.

❖ श्रवण कौशल्याच्या विकासामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन योग्य निर्णय घेण्याच्या क्षमतेचा विकास होतो.

❖ श्रवण कौशल्याच्या विकासामुळे सृजनशीलतेचा विकास होतो.

**8) श्रवण कौशल्य सुधारण्याचे उपाय**

❖ विद्यार्थ्यांना अवधान केंद्रित करण्याची सवय लावावी.

❖ विद्यार्थ्यांना वक्त्याच्या सादरीकरणाच्या शैलीकडे लक्ष देण्यापेक्षा मुख्य विषयाकडे लक्ष देण्यास सांगण्यात यावे.

❖ विद्यार्थ्यांनी मग क्त्याविषयी मनात पूर्वग्रह न ठेवता श्रवण करावे हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगावे.

❖ कोणत्याही विषयाचे भावनांच्या आहारी न जाता श्रवण करावे हे विद्यार्थ्यांना सांगावे.

❖ श्रवण केलेल्या सर्वच गोष्टी लक्षात राहत नाहीत म्हणून महत्त्वाच्या मुद्द्यांची लिखित स्वरूपात नोंद ठेवावी हे विद्यार्थ्यांना सांगावे.

❖ विद्यार्थ्यांनी दक्ष राहून सावधपणे श्रवण करण्याची सवय लावून घ्यावी.

❖ कोणत्याही विषयाचे श्रवण करताना विद्यार्थ्यांनी संकुचित वृत्ती न ठेवता व्यापक दृष्टिकोन ठेवावा.

❖ आपल्या सकारात्मक देहबोलीद्वारे वक्त्याला प्रतिसाद दिल्यास चांगल्या प्रकारे श्रवण होते.

❖ शारीरिक व मानसिक स्तरावर श्रवण करण्यासाठी विद्यार्थी सज्ज असल्यास श्रवण चांगल्याप्रकारे होते.

❖ नाट्यीकरण, कथाकथन, काव्यवाचन, भाषण, वाद-विवाद, परिसंवाद, चर्चा यांसारख्या अभ्यासपूरक कार्यक्रमांच्या माध्यमाने शिक्षक विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्याचा विकास करू शकतात.

❖ आकाशवाणी, दूरदर्शन, विविध वाहिन्यांवरून प्रसारित होणारे दर्जेदार कार्यक्रमांचा आस्वाद याद्वारेही विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्याचा विकास करता येतो.

❖ टेपरेकॉर्डर वर देशदेशभक्तीपर गीते, पोवाडे, कविता, कथाकथन, गोष्टी, समाज सेवक साहित्यिक, कलावंत यांच्या मुलाखती ऐकण्यास सांगूनही विद्यार्थ्यांच्या श्रवण कौशल्याचा विकास करता येतो.

❖ स्टोरी टेलिंग यांसारखे श्रवण कौशल्यांचा अनुभव देणारे ॲप याबद्दलची माहिती सांगूनही श्रवण कौशल्याचा विकास करता येईल.

## संदर्भ

*Anderson, A. & Lynch, T. (2003).* ***Listening****. Oxford University Press*
*Brown, S. (2006).* ***Teaching listening****. Cambridge University Press.*
*Buck. (2001).* ***Assessing Listening****. Cambridge University Press.*
*Cook, V. (2001).* ***Second Language Learning and Language Teaching****. Oxford University Press.*
*अकोलकर, ग. आणि पाटणकर ना. वि. (1996). मराठीचे अध्यापन. 1996 व्हीनस प्रकाशन, पुणे.*
*जोशी, भा. (1998). संवादशास्त्र. विजय प्रकाशन, नागपूर.*
*सांगळे, सं. (2009). व्यावहारिक उपयोजित मराठी आणि प्रसार माध्यमे. डायमंड पब्लिकेशन, पुणे.*

*Copyright © 2019, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*